Issue : XXI, Vol. VI
VISION RESEARCH REVIEW
IMPACT FACTOR 6.20
ISSN 2250-169X
June 2021 To Nov. 2021

7

मंडळ आयोग आणि बिहारचे बदलते राजकारण

डॉ. महादेव मुंडे
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
वसंत दादा पाटील महाविद्यालय,
पाटोदा, जि. बीड.

Research Paper - Political Science

प्रस्तवना:

मंडळ आयोगाच्या अंमलबजावणीमुळे भारताच्या राजकारणात अमूलाग्र बदल होत राहिला. या प्रक्रियेतून भारतीय राजकारणात इतर मागासवर्गीय घटक समोर आला. याची दखल देशातील प्रमुख राजकीय पक्षांना घ्यावी लागली. यातूनच आज राजकीय आभ्यासक इतर मागासवर्गीय आणि राजकारण याचा स्वतंत्र अभ्यास करताना दिसून येतात याचे महत्वाचे कारण म्हणजे प्रत्येक घटकराज्यात इतर सामाजिक घटका पेक्षा इतर मागासवर्गीयांची मोठी संख्या आहे. पण याचे राजकिय महत्वच समोर येण्यास १९९० हे साल उजडले तेव्हा पासून भारतीय राजकारणात उपेक्षीत सामाजिक घटकातील नेतृत्व उदयास आले, या नेतृत्वामुळे प्रादेशिक राजकारणात अशा नेतृत्वानी इतर मागासवर्गीय समाजघटकाचे नेतृत्व केले त्यामुळे वेगवेगळया पक्षामध्ये ही त्यांना चांगले स्थान मिळू लागले. राज्यशात्राचे आभ्यासक रजनी कोठारी म्हणतात भारतीय समाजात जातीच्या विरोधातील राजकारण होऊ शकते परंतु जातीशिवाय राजकारण होऊ शकत नाही"[१] याच आधारावर राजकीय पक्षाची उभारणी झाली असे राजकीय पक्ष इतर प्रदेशीक पक्ष किंवा राष्ट्रीय पक्षाच्या सहकार्याने सत्तेमध्ये सहभगी झाले इतर मागासर्वीय समाज घटकाच्या नेतृत्वास किंवा पक्षास पाठींबा प्राप्त होणे म्हणजे प्रादेशीक पातळीवर राजाकीय वर्चेस्व प्रस्थापित करणे म्हणजे त्या प्रदेशात त्या पक्षाचे किंवा नेतृत्वाची वाटचल सत्तेकडे जाणे यातूनच १९९० नंतर असे नेतृत्व किंवा पक्ष सत्तास्थानी आलेले आहेत.

१९९० नंतर भारताच्या बिहार या घटक राज्यात सत्ता परिवर्तन घडून आलेले आहे. म्हणून मी मंडळ आयोग आणि बिहारच्या राजकारणातील बदल हा विषय समोर ठेवून शोध निबंध पूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे. हा शोध निबंध पूर्ण करण्यासाठी

खालील उद्दिष्टये आणि गृहीते समोर ठेवण्यात आलेली आहेत.

उद्दिष्टये :—

१ भारतातील बिहार या घटक राज्याच्या राजकारणाचा आभ्यास करणे.

२. बिहार राज्यातील सामाजिक घटकांचा आभ्यास करणे .

३. बिहार राज्यातील राजकीय परिवर्तनाचा आभ्यास करणे .

गृहीतके :—

१. मंडळ आयोगाच्या अंमलबजावणीसाठी ज्या चळवळी झाल्या यातून नवीन नेतृत्व उदयास आले .

२. इतर मागसवर्गीय समाज घटकाचे मंडळ आयोगाच्या माध्यमातून राजकीय संघटन झाले.

३. बिहार मध्ये १९९० पासून इतर मागासवर्गीयाच्या नेतृत्वाचा प्रभाव राहिला व आघाडयाचे राजकारण प्रस्थापित झाले.

भारतात स्वातंत्रयानंतर दिर्घकालखंड केंद्रात आणि राज्यात राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाचीच एकाधिकार सत्ता प्रस्थापित होती. विशेष करून प्रत्येक घटकराज्यात पुढारलेल्या वर्गाचे किंवा जाती समुहाचे तत्कालीन कालखंडात कॉंग्रेस पक्षाचे वर्चेस्वा प्रस्थापित होते. बिहारमध्ये ही हीच परिस्थिती होती .

१. बिहारमधील समाजव्यवस्था :—

बिहार राज्यातील कॉंग्रेस पक्षावर उच्चा वर्गानीच वर्चेसव मिळवलेले होते. पण १९७० च्या दशकात विविध सामाजिक व राजकिय आंदोलना सोबत हरितक्रांतीच्या धोरणातून यादव , कुर्मी व कोयरी या शेतकरी ओबीसी जाती संघटीत होऊ लागल्या "राज्यात ब्राम्हण , भूमिहार, कायस्थ, रजपुत, या पुढारलेला समाजाचे प्रमाण सुमारे १५ : आहे. याच वर्चेस्वशाली समाजाने कॉंग्रेसवर नियंत्रण ठेवले होते कॉंग्रेसने यादव व कुर्मी समाजाव्यतीरिक्त मागस समाजाला जवळ केले बिहारमध्ये ओबीसी आणि ओबीसी समुहांचे प्रमाण सुमारे ५० : असून त्यात यादव १५ : कुर्मी ४ : ,कोयरी ६ : या प्रमुख ओबीसी जाती आहेत. यादव नंतर निषादांचे (मल्लाहांचे) प्रमाण १४ : निषादसमाज हा २१ उपजातीत विभागला आहे. अनुसूचित जातींचे प्रमाणे १६ : तर मुस्लीम धर्मीयाचे प्रमाण १७ : आहे "[२]

सन १९६७ पासून बिहारच्या राजकारणाची पडझड होण्यास रूवात झाली. म्हणजे राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाचे जे सामाजिक आधार होते ते विस्थापित होऊन कॉंग्रेस पक्ष हा बहिराच्या सत्तेपासून दुर होत गेला. इतर मागासवर्गीय घटकाने बिहारच्या राजकारणावर

नियंत्राण मिळवले. सत्तराच्या दशकात अनेक घटकराज्यात उच्च जातीय वर्गाकडून सत्ता मध्यम जातीकडे सरकण्याची प्रक्रिया घडून आली. मध्यमा जातीनी इतर कनिष्ठ जाती समुहांना सोबत घेऊन बेरजेचे राजकारण घडवून आणले. तोच प्रयोग बिहार मध्ये ही झालेला दिसून येतो

२.बिहार मधील इतर मागासवर्गीय जातीच्या नेतृत्वांचा उदय:—

१. लालू प्रसाद यादव :—

नवनिर्माण आंदोलनातून पुढे आलेल्या नेतृत्वाचे प्रस्थापित नेतृत्वाकडून सत्ता हस्तांतरीत करून कन्ष्टि पर्यंत आणून नवे राजकारण उभारले ही प्रकिया घडवून अणण्यासा दिर्घकालखंड पाहावा लागला यांचे प्रथम शिलेदार म्हणून लालू प्रसाद यादव यांच्याकडे पाहिले जाते.

लालू प्रसाद यादव यांचा जन्मा दि.११ जून १९४८ रोजी गोपालगंज जिल्हयातील फुलवरिया गावातील एका सर्वसामान्य यादव कुटूंबात झाला शालेय शिक्षण गावातच पूर्ण करून महाविद्यालयीन शिक्षण पाटना येथे पूर्ण केले .एम.ए.राज्यशास्त्र आणि कायदयाची पदवी प्राप्त केली. विद्यार्थ्यी आंदोलनात सक्रिय सहभाग, पाटना विद्यापीठाच्या विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष, त्याच दरम्यान जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखालील परिवर्तनाच्या लढयामध्ये सक्रिय सहभागी झाले होते. याचा आंदोलनात लालू प्रसाद यादव, शरद यादव , जॉर्ज फर्नांडिस, रामविलास पासवान नितीन कुमार हे सर्वच नेतृत्व सक्रिय सहभागीय होते. "सुरूवातीत क्लार्कची नोकरी करणारे लालु प्रसाद १९७७ मधील लोकसभा निवडणुकीत वयाच्या एकोणतिसाव्या वर्षी छपरा मतदार संघातून जनता पक्षाकडून निवडून आले आणि तेव्हा पासून त्याचे राजकीय जीवन उंचावले गेले "३ लालू प्रसाद यादव हे ज्या यादव घराण्यात जन्मलेले होते ते यादव घराने इतर मागास वर्गीयांमध्ये मोडले जाते. जनता पक्षाच्या फुटीनंतर लालू प्रसाद हे राज नारायण यांच्या नेतृत्वाखाली जनता पार्टी (एस) मध्ये गेले . १९८० मध्ये लोकसभेस पराभूत झाले पण १९८९,२००४,२००९ मध्ये लोकसभेत निवडूण आले. १९८९ मध्ये बिहाराच्या विधानसभेत विरोधी पक्ष नेते असताना १९८९ मध्ये लोकसभेत निवडून आले होते. तसेच १९८०, १९८५, १९९०, १९९५ या चार विधानसभा निवडणूकात निवडून आले होते. १९९० ते १९९७ पर्यंत राज्याचे मुख्यमंत्री राहिले . त्यांना चाराघोटाळयातील आरोपानंतर मुख्यमंत्री पद सोडावे लागले पण १९९७ ते २००५ पर्यंत त्यांची पत्नी राबडी देवीना मुख्यमंत्री करून पडदया माणून राज्य कारभार चालवला , लालू प्रसाद याना जनता दलातून बाहेर पडून राष्ट्रीय जनता दलाची स्थापणा केली होती.

लालू प्रसाद यादवांचे वैशिष्टे म्हणजे मंडळ आयोगाच्या अंमलबजावणीसाठी पाटपुरावा करून अतिमागस ओबीसी जातींना संघटित करून उच्च जातवर्णीयांचे वर्चस्व आसणाऱ्या काँग्रेसला आव्हान दिले. बिहार मध्ये १९९० ते १९९५ या पहिल्या टप्पयात मंडळ शिफारशीच्या २७ : आरक्षणाची व्यस्थीत अंमलबाजवणी केली. या सदंर्भात १९९० मध्ये पटना शहरातील गांधी मैदानात भाषण देताना स्पष्टीकरण केले की ,"चाहे धरती आसमान में लटक जायें.. या आसमान धरती पर गिर जाये, मगर मंडल कमिशन लागू होकर रहेगा "[४] हे वाक्य बिहारी लोक आजून ही विसरलेले नाहीत. त्यांच्या राजकारणाचे दुसरे वैशिष्टये असे म्हणतात येईल की, भाजप नेते लाल कृष्ण् अडवाणी यांची रथयात्रा आडवून हिंदुत्ववादास आव्हान दिले. तेव्हापासून भाजपाचे शत्रु झाले परिणामत: मुस्लीम समाजात लालू प्रसादाविषयी विश्वास निर्माण झाला आणि धर्मनिरपेक्ष प्रतिमा निर्माण झाली.

२. रामविलास पासवान :—

राष्ट्रीय पातळीवर दलित समाजाचे (अनुसूतिच जातीचे) राजकीय नेतृत्व म्हणून रामविलास पासवान यांची ओळख होती. लोकजनशक्ती पार्टीचे ते संस्थापक व अध्यक्ष होते. १९६९ मध्ये बिहार विधानसभा निवडणुकीत त्यांनी पहिला विजय मिळवला ते नऊ वेळा लोकसभेचे व दोन वेळा राज्यभेचे प्रतिनिधित्व करताना त्यांनी सहा पंतप्रधानांसोबत वेगवेगळया खात्यांची जबाबदारी सांभाळली होती.बिहार राज्यातील जयप्रकाश नारायण यांच्या आंदोलनातून अनेक नेतृत्व उदयास आले. त्या पैकी रामविलास पासवान एक होते. त्यांचा जन्म ५ जुलै १९४६ रोजी बिहार मधील खरगीया येथे झाला. त्यांनी बुंदेल खंड विद्यापीठातून एम.ए.एल.एल.बीचे शिक्षण पूर्ण केले. त्यांची बिहार लोकसेवा आयोगाच्या परिक्षेतून पोलीस उपअधीक्षक पदी निवड झाली होती. परंतु नोकरी स्वीकारण्याऐवजी संयुक्त सोशॅलिस्ट पक्षात प्रवेश करून राजकिय जीवनास सुरूवात केली. बिहार राज्यात अनुसूचित जातीचे प्रमाण १६ : असलेल्या समाजातूनच कोणत्याही प्रकारची राजकीय पार्श्वभूमी नसताना त्यांचे नेतृत्व उदयास आले. पासवान हे अनूसूचित जातीतील 'पासवान ' या उपजातीतील आहेत. बिहार मधील अनुसूचित जातीतील वर्चेस्वशाली आणि आक्रमक समाज म्हणून ओळखला जातो. रामविलास पासवान यांनी "दलिताच्या कल्याणासाठी आणि उध्दारासाठी १९८३ साली 'दलीत सेना'नावाची संघटना स्थापन केली "[५] या संघटनेच्या माध्यमातून दलित समाजाचे संघटन केले , तसेच याची सिमा बिहार राज्यापूर्ती न ठेवता इतर राज्यात ही या संघटनेचा विस्तार केला. समाजिक न्यायाच्या आधारावर मागासलेल्या गरीब, पिडीत

, अल्पसंख्या समाजाच्या समस्या खुल्या मनाने मांडता याव्यात म्हणून "१९९१ पासून 'नाथ चक ' या मासीकाची सुरूवात केली"६ १९७५ च्या राष्ट्रीय आणीबाणीच्या विरोधी आंदोलनातील सहभामुळे त्यांना दोन वर्ष तुरूगवास भोगावा लागला.

राजकिय जीवन :—

संयुक्त सोशॅलिस्ट पक्षाच्या तिकीटावर १९६९ च्या विधानसभा निवडणूकीत वयाच्या २३ वर्षी विजयी झाले होते. दलित समाजाचा चेहरा म्हणून ते समाजाचे ही नेतृत्व करू लागले होते. सोबत मुस्लीम समाजासही घेतले होते. त्यांनी आपले नेतृत्व दलितापुर्तेच मर्यादित न ठेवता मंडळ आयोगाच्या अंमलबजावनीत भाग घेतला. रामविलास पासवान यांनी "१९७७ पासून १९८०, १९८९, १९९१, १९९६, १९९८, १९९९, २००४, २०१४ नऊ वेळा हाजीपुर लोकसभा मतदार संघाटचे नेतृत्व केले."७

भारतीय राजाकारणातील राजकिय बदलाचे अचुक अंदाज बांधनारे एक मुरब्बी नेतृत्व म्हणून त्यांची ओळख होती. राजकीय जीवन प्रथम जनता पक्ष जनता दल, जनतादल युनायटेड असा प्रवास करत "२८ नोंव्हेबर २००० रोजी लोक जनशक्ती पक्षाची स्थापना केली"८ या पक्षाच्या नेतृत्वाखाली २००४ संयुक्त पुरोगामी आघाडीसोबत लोकसभा निवडणुक लढवून चार जागा जिंकल्या पण २००९ ची निवडणुक स्वतंत्रापणे लढवण्यात आली पक्षास एक ही जागा मिळवता आली नाही. २०१४ व २०१९ च्या लोकसभा हया राष्ट्रीय लोकशाही आधाडी सोबत लढवून सहा—सहा जागा जिंकल्या बिहार राज्याच्या राजकारणात लोक जनशक्ती पक्षास सर्व बिहार राज्यात विस्तार कसा झाला नाही. पासवान जातिबहुल जिल्हयापुरतेच त्यांना यश मिळाले.

रामविलास पासवान यांनी १९८४ ची निवडणुक ही जनता दलाच्या नेतृत्वाखाली लढवून विजय झाले याच वेळी व्ही.पी.सिंग सरकारच्या मंत्रीमंडळात त्यांचा पहिल्यांदाच कॅबीनेट मंत्री म्हणून कामगार व रोजगार खाते देण्यात आले. १९९६ च्या एच.डी. देवेगौंडा यांच्या मंत्रीमंडळात रेल्वे व संसदीय कामकाज मंत्री म्हणून देण्यात आले. १९९९ च्या अटलबिहारी वाजपेयी यांच्या सरकारमध्ये दूरसंचार मंत्री, कोळसा आणि खाण मंत्री म्हणून ही त्यांनी जबाबदारी संभाळली. २००४ मध्ये मनमोहन सिंह सरकारमध्ये रसायने व खते मंत्री म्हणून कार्यभार सांभाळला नरेंद्रमोदी यांच्या मंत्री मंडळामध्ये २०१४ व २०१९ मध्ये अन्न व नागरी पुरवठा मंत्रीपद भूषवले होते ते सत्तेमध्ये प्रत्येक वेळी महत्वाच्याच खात्याची जबाबदारी सांभाळलेली होती. त्यांचे उत्तराधिकारी म्हणून त्यांचे चिरंजीव चिराग पासवान हे लोकजनशक्ती पक्षाचे अध्यक्ष म्हणून विराजमान असून ते नेतृत्वा करत आहेत.

३.नितीश कुमार :—

बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांचा जन्म १९५१ मध्ये बिहार राज्यात अनुसूचीत जनजमाती समाविष्ट असणाऱ्या जातीत झाला नितीश कुमारच्या वडील स्वातंत्रयपुर्व कालखडात स्वातंत्रयाच्या आंदोलनात सहभागी होते. नितीश कुमारचे शिक्षण मॅकेनिकल इंजिनिअर पूर्ण करून बिहार राज्याच्या विधुत मंडळात नोकरी करत होते. ते जयप्रकाश नारायण यांच्या आंदोलनात सहभागीय झाले. या आंदोलनाच्या माध्यमातूनच राजकारणात प्रवेश केला.१९८५ मध्ये बिहारच्या विधानसभा निवडणूक लढवून विजयी झाले. १९८९ ला जनता दलाच्या महासचिव म्हणून निवड झाली त्यावेळी त्यांनी लोकसभा निवडणुक लढवून विजय प्राप्त केला आणि व्ही.पी.सिंगाच्या मंत्रीमंडळा मध्ये कृषी राज्यमंत्री होते. १९९१ च्या लोकसभा निवडणुकीत निवडून आले त्यांची जनतादलाच्या संसदीय उपनेतेपदी निवडकेली होती.१९९६,१९९८,१९९९,२००४ च्या लोकसभेत निवडून आले होते. अटलबिहारी वाचपीच्या मंत्रीमंडळात ते कॅबीनेट मंत्री होते. सन २००५ च्या बिहारच्या निवडणुकीत विजय झाले व राज्याचे मुख्यमंत्री झाले.

४. शरद यादव :—

शरद यादव यांचा जन्म मध्यप्रदेश मध्ये झाला त्यांचे शिक्षण इंजिनियरिंग झाले होते ते इंजिनियरिंगला असतानाच विद्यार्थी संघाचे अध्यक्ष झाले होते. शरद यादव हे राममनोहर लोहिया यांच्या विचाराने प्रेरीत झालेले होत. त्या कालखंडातील वेगवेगळया आंदोलनात ही त्यांचा सक्रिय सहभाग होता. त्यांनी मंडळ आयोग लागू करण्यासाठी प्रयन्त केले होते. १९७४ मध्ये प्रथम मध्यप्रदेशाच्या जबलपूर लोक सभा मतदार संघातून निवडून आले. १९७७ मध्ये लोकसभेवरील निवडून आले या वेळी ते युवा जनता दलाचे अध्यक्ष झाले १९८९ —१९९० मध्ये ते केंद्रीयमंत्री झाले.

१९९१ ते २०१४ पर्यंत बिहारच्या मधेपुरा लोकसभा मतदार संघातून निवडून आले. १९९७ मध्ये ते जनता दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष झाले. १९९९ ते २००४ पर्यंत केंद्रीय मंत्रीमंडळात विविध खातयाचा कारभार संभाळला होता. त्यांच्या १९७४ च्या जयप्रकाश नारायण यांच्या संपूर्ण क्रांतीच्या चळवळीत सक्रिय सहभागी होते. त्यांचा बहिराच्या राज्यकारणावरचे प्रभाव निश्चीत झाला होता.

वरिल सर्व बिहार मधील नेतृत्व हे बहुजन नेतृत्व म्हणून पुढे आले. विशेष करून हे सर्व नेतृत्वाने जयप्रकाश नारायण यांच्या चळवळीतील सहभागातूनच नेतृत्वाचा उदय झालेला आहे. पण या नेतृतवाचे राजकीय प्रवास हा वेगवेगळया पक्ष नेतृत्वाच्या माध्यमातून १९९० नंतर च्या केंद्रात व राज्यात सत्तास्थानी होते. तसेच मंडळ आयोगाच्या

अंमतलबजावणीसाठी अग्रही असलेलेले नेतृत्व होते . बहिर राज्या मध्ये दलीत बहुजन वादी नेतृतवाने खर्‍या आर्थने परिवर्तन घडून आणलेले आहे.या राजकीय परिवर्तनाचा आढावा थोडक्यात घेणार आहोत.

३. मंडळ आयोग आणि बिहार राज्यातील राजकीय परिवर्तन :—

आघाडयाचे राजकारण हे १९९० नंतर भारातीय राजकारणाचे प्रमुख वैशिष्टये म्हणून पुढे आलेली संकल्पना आहे. केंद्रात आणि काही घटक राज्यात कोणत्याच एका पक्षास बहुमत मिळेनासे झाले आहे. म्हणून समविचारी राजकीय पक्ष एकत्र घेऊन आघाडीची संकल्पना अपरिहार्य झाली. या आघाडयांच्या प्रक्रिया ही निवडणुकपुर्व आघाडी किंवा निवडणुक नंतर आघाडीचे अस्तीत्व दिसून येऊ लागले . बिहार राज्य यास अपवाद नव्हतेच पण या आघाडयाच्या राजकारणावर मंडळ आयोगाच्या अंमलजबजावणीचा प्रभाव छाया पडलेली होती. हे नाकारता येणार नाही.

नव्वदीच्या दशकाच्या सुरूवातीस मंडळ आयोगाने इतरमागास जातींना आरक्षण देण्या संदर्भात केलेल्या शिफारशींची अंमलबजावणी करण्याची मागणी होत होती. यातूनच ओबीसी समाजात राजकीय जागृती वाढून हा समाज संघटीत होऊ लागला याच वेळी देशात दुसरी प्रकिया घडत होती. ती म्हणजे राममंदिराचा मुध्दा घेऊन भाजप आपला विस्तार करत होता त्याच वेळी मंडळ आयोगास सहमती नोंदणार्‍या व राम मंदिराविषयी मवाळ भूमिका घेणार्‍या राष्ट्रीय काँग्रेस प्रश्नाची र्‍हासाकडे वाटचाल घडून येत होती. यातूनच बिहार राज्यात १९९० मध्ये काँग्रेस, जनता दल आणि भाजप यांच्यातील स्पर्धा आकारास आली. मंडळाच्या मुद्यावर लालू प्रसाद यादव, जॉर्ज फर्नांडिस, शरद यादव , नीतीश कुमार आणि रामविलास पासवान या नेतृत्वाने ओबीसी—दलित—मुस्लीम आघाडीची स्वतंत्र रित्या मोट बांधत काँग्रेसला पराभूत केले. परंतू यथावकाश नेतृत्वाच्या स्पर्धेतून जनता दलाचे विभाजन झाले. बिहारचे राजकारण हे लालू प्रसाद यादव व नितीश कुमार यांच्या भोवती फिरू लागले.

४. बहिर आणि वाढती सत्ता स्पर्धा :—

वहिरा मध्ये लालू प्रसाद यादव , नीतीश कुमार, रामविलास पासवान हे विशेष करून आपल्या सामाजिक परिघाभोती नेतृत्व प्रस्थापित करून राहिले. १९९० च्या विधान सभेच्या निवडणुकीत लालू प्रसाद यादव यांना चांगल्या जागा मिळाल्या परंतु बहुमता पर्यंत जाता आले नाही. एकुण झालेल्या मतदाना पैकी २५.६: मतदान राष्ट्रीय जनता दलाने मिळावले. सत्तेसाठी मात्रा त्यांनी इरत छोटया पक्षास सोबत घेऊन सत्ता मिळवण्यात यशस्वी झाले. १९९५ च्या निवडणुकीत लालू प्रसादांच्या नेतृत्वाखाली

जनता दल आघाडी करून सत्तेवर आले. १९९७ मध्ये जनता दलाचे विभागजन झाले तेंव्हा "अल्पमतातील राबडी देवी सरकारला काँग्रेसचा आणि डाव्या पक्षांचा पाठिंबा घ्यावा लागला "' सन १९९०,१९९५,२००० या विधानसभेत लालू प्रसाद यांना चांगल्या जागा मिळाल्या पण बहुमत मिळवता आले नाही. छोटया पक्षाच्या पाठींब्याने सत्तेत राहिले. सन २००५ व २०१०च्या निवडणूकात नितीश कुमार यांनी भाजपा सोबतराहुन सत्ता मिळवण्यात यशस्वी झाले. पण २०१४ च्या लोकसभा निवडणुकीच्या वेळी भाजपाच्या पंतप्रधान पदाचाउमेदवार नरेंद्र मोंदी नको म्हणून एन.डीए या आघाडीतून बाहेर पडले. बिहार मधील २०१५ च्या विधानसेत जुने मित्र लालू प्रसाद यादव यांच्या बरोबर आघाडी केली. या आघाडीत काँग्रेस जद(यु), राजद, आणि डावे पक्ष समाविष्टहोते .या आघाडीस स्पष्टबहुमत प्राप्तझाले पण ही आघाडी फारकालखंड टिकली नाही नितीश कुमार पुन्हा नरेंद्रमोंदीच्या नेतृत्वा खालील एनडीए मध्ये सहभागी झाले .बिहार मध्ये १९९० नरंतर काँग्रेस पक्षाची वाटचाल ही ऱ्हासाकडेच होत राहीली .

सन २०२० मध्ये बिहार विधानसभेची निवडणुक झाली या मध्ये प्रमुख दोन आघाडया मध्ये सत्ता संघर्ष घडून आला. एक लालू प्रसाद यादव यांचे चिरंजीव तेजस्वी यादव यांच्या नेतृत्वा खाली महागठबंधनात राजदला सोबत काँग्रेस,माकप, भाजप, माकप माले, झारखंड मुक्ती मोर्चा हे पक्ष आहेत तर जद(यु.) सोबत भाजप आणि जीतनराम मांझी यांच्या हम पक्ष नितीश कुमारांच्या नेतृत्वाखाली एनडीए मध्ये समाविष्ठ होता . तर रामविलास पासवान यांच्या लोकजनशक्ती पार्टीने स्वतंत्रपणे निवडणुक लढवली प्रमुख दोन आघाडयाच्या राजकारणात तत्कालीन मुख्यमंत्री नितीश कुमार यांना मोठे आव्हान निर्माण करून तेजस्वी यादव यांनी मोठी लढत दिली. बहिराच्या या निवडणुकीत तेजस्वी यादव यांना सर्वाधिक मते आणि जागा प्राप्तझाल्या पण नितीश कुमार यांच्या आघाडीत बहुमत प्राप्तकरता आले.

निष्कर्ष :—

मंडळ आयोगाच्या शिफारशी पासूनच बिहार राज्यात ओबीसी जाती मध्ये संघटन होण्यास प्रारंभ झाला. याच संघटनाचा परिणाम हा सन १९९० च्या बिहार विधानसभा निवडणुकातून दिसून आला. काँग्रेस हा प्रबळ असणार पक्ष सत्ते पासून दूर गेला जनता दलाच्या माध्यमातून ओबीसी नेतृत्वाने छोटया पक्षास सोबत घेऊन सत्ता स्थापन केली. या कालखंडा पासून २००५ पर्यंत लालू प्रसाद यादव यांच्याकडे सत्ता टिकून ठेवण्यात यशस्वी ठरले होते. २००५ च्या विधानसभेच्या निवडणुकीतून नितीश कुमार यांच्या नेतृत्वाखाली सत्ताधिश झाले. नितीश कुमारा यांनी सातत्याने आजपर्यंत सत्तास्थापन

जदयु दृभाजपाने केले या कालखंडात बिहारचा विकासदर उंचावला होता. मागसवर्गीयानसाठी स्वंतत्रा योजना व शेती क्षेत्रासाठी विविध योजना राबवण्यात आल्या पण औद्योगिक विकासाकडे दुर्लक्षच राहिले.

मागासलेल्या जाती व जमातीतून जे बिहारचे नेतृत्व उभारले गेले त्यानंतर मात्रा नव नेतृत्व फारेस उदयास येऊ शकले नाही. बिहार मधील राष्ट्रीय जनतादलाचे नेतृत्वकरणारे लालू प्रसाद यादव, रामविलास पासवान यांचे वारस म्हणून पुढे आलेले नेतृत्व करत असताना दूसन येतात. सन २०२० च्या बिहारमधील विधानसभेच्या निवडणूकातून स्पष्टहोते की इतर मागास वर्गातून पुढे आलेले नेतृत्वच राजकिय वाटचाल करूत आहेत.

असे म्हणता येईल की वारसाने जरी नेतृत्वाच्या व्यक्ती बदलल्या तरी ज्या नेतृत्वाला ज्या समाज घटकांच्या पाठींबा होता तो याही निवडणुकीच्या माध्यमातून थोडा कमी अधिक असला तरी तो स्थीरच असलेला दिसून येतो.

संदर्भ सूची :-

१. विवेक घोटाळे :— मंडळ नंतरचे बहुजनवादी राजकारण विशेष लेखमाला ४ थी कर्तव्या साधना दिनांक ३० ऑक्टो.२०२०
२. कित्ता
३. विवेक घोटाळे :— लालू प्रसाद यादव दृपिछडयाचे नायक, आगडयांचे खलनाक कर्तव्यसाधना लेखमाला दिनंक ७ नोंव्हेबर २०२०
४. कित्ता .
५. बिहार विनासभा निवडणूक २०२० कर्तव्यासाधना लेखमाला ३ री दिनांक २७/१०/२०२०
६. कित्ता .
७. भारतीय निवडणूक आयोग अहवाल.
८. उपरोक्तक्रमांक ५
९. बिहार मधील आघाडयांचे राजकारण कर्तव्यासाधना लेखमाला १८ ऑक्टो. २०२०
१०. कित्ता व बिहार विधानसभा निवडणुक निकाल २०२० विकी पीडीय.